# विश्वास को-ऑप. बँक लि; नाशिक

संचयात् समृध्दीः

प्रशासकीय कार्यालय, विश्वविश्वास पार्क, स्वातंत्र्यवीर सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक-१३. टेलीफॅक्स: (०२५३)२३०५६०० ते ०३

## KYC / Re-KYC करणेबाबत ग्राहकांसाठी सुचना

बँकेच्या सर्व सन्माननीय ग्राहकांना विनंती करण्यात येते की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चे निर्देशानुसार वैयक्तिक ग्राहकांची आणि कायदेशीर संस्था (Legal Entity / Non individual) व त्यांच्या लाभार्थी (Beneficial Owner / Authorised Signatory) यांची बँक खात्यास KYC कागदपत्रांची पूर्तता करणे तसेच नियमित अंतराने Re-KYC करणे अनिवार्य आहे.

१) ज्या ग्राहकांनी त्यांची के. वाय. सी. अद्यावत करण्याकरिता बँकेकडे कागदपत्रे अद्याप जमा केलेली नाहीत. अशा सर्व ग्राहकांनी के. वाय. सी. अद्यावत करण्याकरिता फोटो, ओळखीचा पुरावा व पत्त्याचा पुरावा (आधार कार्ड, पासपोर्ट, मतदान कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मनरेगा जॉब कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीद्वारे जारी करण्यात आलेले नाव आणि पत्त्याचा तपशील असलेले पत्र. या पैकी कोणतेही एक) आणि पॅन क्रमांक किंवा फॉर्म ६० इ. कागदपत्रे बँकेकडे त्वरीत जमा करावीत.

२) तसेच ज्या ग्राहकांनी मागील १ वर्षापासून खात्यावर कोणतेही व्यवहार केलेले नसतील अशा सर्व ग्राहकांना विनंती आहे की, त्यांनी खात्यावर त्वरीत व्यवहार करण्यासाठी बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा.

३) खात्यामध्ये जर २ वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता कोणताही व्यवहार झालेला नसल्यास असे बचत/चालू खाते निष्क्रिय (Inoperative) समजण्यात येते.

४) तसेच ज्या ग्राहकांनी मागील १० वर्षांपासून खात्यावर कोणतेही व्यवहार केलेले नसतील असे बचत/चालू/ठेव खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमाप्रमाणे RBI च्या DEAF खात्यामध्ये वर्ग करण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

५) के.वाय.सी./रि के.वाय.सी. कागदपत्रांची अपुर्तता असलेली खाती तसेच निष्क्रिय (Inoperative) खात्यांवर कोणतेही व्यवहार करता येणार नाहीत व अशी खाती आपोआप गोठवली (Debit Freeze) जातील.

६) Inoperative/DEAF खातेदारांच्या नावाची यादी बँकेच्या वेबसाईटवर व शाखेमध्ये सुद्धा उपलब्ध आहे, याची कृपया आपण नोंद घ्यावी.

७) अधिक माहितीसाठी 7030912042 व 9130020888 यावर संपर्क साधावा.

कृपया आपण आपले खाते Active ठेवण्यासाठी के. वाय. सी. कागदपत्रे व फोटोसहित त्वरीत शाखेशी संपर्क साधावा आणि खाते Active ठेवावे.

दि. २६/०५/२०२६

**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**

विश्वास को-ऑप बँक लि., नाशिक.